# सुनिल विनोदराय रायठठ्ठाः उद्योजक घडवणारा महाउद्योजक.

नाविण्यपूर्णता ... इनोव्हेशन या कल्पक प्रतिभेचे लेणे आणि सकारात्मक विचारांचा प्रत्यक्ष व्यवहार सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा अखंड प्रयत्न अशा अनोख्या परिसस्पर्शी व्यक्तीमत्वाचे महाउद्योजक सुनिल विनोदराय रायठ्ठा जालना येथील एका सामान्य मध्यमवर्गीय गुजराती कुटुंबात 1956 मध्ये जन्मले.

जालन्यातील सी.टी.एम.के. गुजराती विद्यालयातून शालेय शिक्षण व जेईएस महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद येथून 1977 मध्ये यांत्रिकी अभियांत्रिकी अभ्यासक्रमात मराठवाडा विद्यापीठातून सुवर्णपदक त्यांनी मिळविले.

लार्सन ॲण्ड टुर्बो पवई मुंबई येथे 1977 ते 1982 या काळात ट्रेनि इंजिनियर म्हणून त्यांनी प्रारंभी काम केले. बालपणापासून नाविण्याच्या शोधात कल्पकतेच्या प्रतिभेचे अभ्यासक उद्योजकीय व्यक्तीमत्व असलेल्या सुनिलजीचे मन नौकरीत कायमचे रमणे अशक्यच... एल ॲण्ड टी च्या नौकरीचा 4 वर्षाच्या अनुभवाची शिदोरी घेऊन 1982 ला औरंगाबाद येथे टाईम इंजिनियर या नव्या उद्योगाचा भागीदारीत त्यांनी प्रारंभ केला. इलेक्ट्रॉनिक्स इन्स्ट्रुमेंटससाठी लागणा-या फिक्चर्स आणि पीसीबी वर कंपोनंट बसवण्यासाठी नव्यानेच विकसीत करण्यात आलेले जीग या अनोख्या आणि त्या काळातील नाविण्यपूर्ण साधनांचे उत्पादन त्यांनी सुरू केले. सन 1984 मध्ये जालना येथे इलेक्ट्रो मॅग्नेटीक रिले या इलेक्ट्रॉनिक्स कंपोनंटचे उत्पादन करणारा कोअर्स ॲण्ड क्वाईल हा भागीदारीतला नवा लघु उद्योग सुरू केला.

अत्यंत खडतर प्रवास छोटया 10 बाय 10 च्या रूममध्ये एकाच सहका-यासोबत 18 -18 तास सुनिलजी स्वतः काम करत इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानातील प्रत्येक दिवस घेऊन येत असलेला नवा बदल आणि क्रांती यामुळे झपाटयाने होणारे परिवर्तन याचा एकुणच अशा लघु उद्योगावर परिणाम होत होता. सुनिल रायठठ्ठा आणखी नव्या नाविण्यापूर्णतेच्या शोधात होतेच ट्रॉपिकल या नव्या ब्रँड नावाने वॉटर हिटर्स आणि एअर कुलर्स त्यांनी तयार करणे सुरू केले. पुढे एअर कुलरची जागा ए. सी. ने घेतली व ट्रॉपिकल एअर कुलर मागे पडू लागले.

उद्योग क्षेत्रातील सलग 22 वर्षाच्या संघर्षशील वाटचालीनंतर सुनिल रायठठ्ठा पुन्हा एकदा नव्या नाविण्यपूर्णतेची भरारी घेण्याच्या तयारीत होते. 1994 मध्ये विनोदराय इन कार्पोरेट या स्वतःच्या स्वतंत्र उद्योगाची त्यांनी मुहुर्तमेढ रोवली. मराठवाडयातील प्रतिष्ठीत उद्योग निर्लेप, इडयुरन्स, काबसन्स आणि एनआरबी बेअरिंग लि. या कारखान्यामध्ये प्रत्यक्ष उत्पादनासाठी त्यांच्या गरजेनुसार विशिष्ट अशा स्पेशल पर्पज मशिनरीजचे स्वतः डिझायनिंग करून त्याचे उत्पादन आणि पुरवठा हे काम सुनिल रायठठ्ठांनी सुरू केले. जालन्यातील छोटया मोठया अनेक लघु कारागिरांचा एक समुह सुनिलजीनी एकत्र जमवला. यात वेंल्डर्स, मशिनिष्ट, फिटर, टर्नर, कारपेंटर यांचा समावेश होता. या प्रत्येक कारागिराच्या हातातील हुन्नर ओळखून त्याला विशिष्ट काम व त्यासाठी कौशल्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण सुनिल रायठठ्ठा स्वतः देतात. त्यांच्या अशा सकारात्मक वाटचालीत जालन्यातील शेकडो कारागिर आज उद्योज जगतातील कौशल्यपूर्ण कामे करण्यात तरबेज झाले आहेत.

जालना व औरंगाबाद औद्योगिक वसाहतीतील अनेक कारखान्यात सुनिल रायठठ्ठा हे प्रॉब्लेम सॉल्वींग समस्येचे निदान व त्यातून सुटका करणारे परवलीचे व्यक्तीमत्व झाले. रात्री अपरात्री देखील कारखाना मालकांच्या अपरोक्ष कारखान्यातील इंजिनिअर्स, ऑपरेटर्स थेट सुनिलजींशी संपर्क करून आपल्या समोर आलेली अडचण मांडून त्यातून मार्ग शोधून घेतात. हे काम करतांना ते कधीच कुणाला नाही म्हणत नाहीत.

1998 विनोदराय इन कॉर्पोरेटने रोटो मोल्डींग मशिनरीजचे उत्पादन सुरू केले. घराच्या छतावर असलेल्या पाण्याच्या टाक्या बनवणारे यंत्र निर्माण करणारा हा अनोखा कारखाना लोखंड आणि बियाणे उद्योगाची पंढरी समजल्या जाणा-या भूमिपुत्र उद्योजकांच्या जालना नगरीत इथल्या औद्योगिक वसाहतीची विशिष्ट ओळख झाला आहे. हा उद्योग चालवत असतांना आपल्या सहकारी कारागिरांना वेंडर बनवण्याच्या संकल्पनेवर सुनिल रायठठ्ठांनी अधिक गतीने काम सुरू केले. कालपर्यंत कारखान्यामध्ये काम करणारा वर्कर आज आता वेंडर म्हणजे कौशल्यपूर्ण छोटी कामे स्वतःच्या अंगावर घेऊन स्वतःच्या बळावर करणारा झाला. हे करत असतांना त्याला सर्व प्रकारचा सकारात्मक आधार सुनिल रायठठ्ठांच्या रूपाने जालन्याच्या औद्योगिक वसाहतीत उभा आहे. जागा, पैसा, विज व कामात येणा-या सर्व अडचणी दूर करत सुनिलजींनी असे अनेक वर्कर्स वेंडरमध्ये रूपांतरीत केले आहेत. आजही त्यांचा हा छोटे उद्योजक कारागिर घडवण्याचा उपक्रम अखंड सुरू आहे.

विनोदराय इन कार्पोरेट मधून तयार होणारे विशेष रोटो मोल्डींग मशिन स्वतःची एक स्वतंत्र ओळख घेउन बाजारात हळूहळु स्थिर होऊ लागले. महाराष्ट्राच्या सिमा ओलांडून संपूर्ण देशात विविध भागात सुनिलजींच्या मशिनला चांगली मागणी येत होती. सुनिलजींनी तयार केलेली एक मशिन म्हणजे एक उद्योजकच. ती मशिन जिथे विकल्या जाई तेथे एक ओव्हरहेड टॅक तयार करण्याचा कारखाना सुरू होतो. दहा माणसे काम करत एक मालक उद्योजक उभा राहतो. अशा शेकडो मशिन्स तयार करून सुनिलजींनी देशभरात व जगातील 50 हून अधिक देशात अनेक उद्योजक आज उभे केले आहेत.

सन 2000 विनोदराय इन कार्पोरेटला देशाबाहेरची पहिली ऑर्डर मिळाली. फिजी या देशातून रोटो मोल्डींग मशिनची ऑर्डर आली आणि सुनिल रायठठ्ठा या उद्योजकाचा विश्व संचार सुरू झाला. आज 2014 मध्ये जगातील 50 हून अधिक देशात विनोदराय इन कार्पोरेट यांच्या रोटो मोल्डींग मशिन्सवर उद्योग उभे राहीले आहे. वर्षाला सुमारे 20 कोटी रूपयाहून अधिकच्या उलाढालीतून 50 टक्क्याहून अधिक परदेशात विकणा-या

मशिनरीजचे उत्पादन केल्या जाते. देशाला बहुमोल परकीय चलन आणि देशांतर्गत उद्योजकता विकास घडवून आणणारा हा महाउद्योजकाचा सकारात्मक विस्तार वाढत वाढत जात आहे.

उद्योजकतेसोबत सामाजिक बांधीलकीचा वसा सुनिल रायठठ्ठा यांनी तेवढयाच ताकदीने चालवला आहे. जालन्यातील सर्वार्थाने उपेक्षित शिकलकरी या समाजाच्या सर्वागिण उन्नतीचा प्रकल्प ते राबवतात विनोदराय इन कार्पोरेटमध्ये शिकलकरी समाजातील अत्यल्प शिक्षण घेतलेले युवक आज इंजिनिअरपेक्षाही अधिक कौशल्याची कामे करतात. दर तीन महिन्याला कंपनीचा लेखाजोखा सर्वासमोर ठेवल्या जातो व झालेल्या नफयातील हिस्सा सर्व कामगारांना समानतेने दिला जातो. कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणातील अर्धा खर्च रायठठ्ठा उचलतात. त्यामुळे अत्यंत विश्वास आणि समाधानाचे सशक्त वातावरण विनोदराय मधील अनोखा अनुकरणीय औद्योगिक आदर्श आहे. जालन्यातील उपेक्षित शिकलकरी समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीचा देवगिरी विद्यार्थी विकास प्रकल्प आणि इयत्ता 8 वी नंतर शाळा सोडून दिलेल्या मुलींच्या सर्वागिण विकासाचा किशोरी  विकास प्रकल्प हे जालना एज्युकेशन फाउंडेशन- यंग इनोव्हेटर या संस्थेच्या माध्यमातून चालणा-या सेवा कार्याच्या पाठीशी सुनिल रायठठ्ठा हे संपूर्ण शक्तीनिशी उभे आहेत. यंग इनोव्हेटर्स या संस्थेच्या माध्यमातून जालन्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी रोबोटीक तंत्रज्ञान कार्यशाळा हा नाविण्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम ते राबवतात.

मराठवाडयातील औद्योगिक नगरी औरंगाबाद येथील ॲटो क्लस्टर च्या विकासात सुनिल रायठठ्ठा यांचा मोठा प्रत्यक्ष सहभाग आहे. मराठवाडा इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर या उद्योजकीय संघटनेचे अध्यक्षपद त्यांनी भुषवले आहे. देवगिरी नागरी सहकारी बँकेचे ते उपाध्यक्ष आहेत. जालन्यात रोटरी क्लबच्या माध्यमातून दोन वेळा महाएक्सो  या उद्योग व्यवसाय क्षेत्राच्या कुंभमेळयाचे व औरंगाबाद व पुणे येथे उद्योजकीय विकास कार्यक्रमाचे त्यांनी अत्यंत यशस्वी आयोजन केले आहे.

सर्वसामान्यावर प्रचंड सकारात्मक विश्वास टाकत त्याचे कौशल्य ओळखून जबाबदारीसह कामाला लावण्याचे अनोखे कसब सुनिल रायठठ्ठांचा विशेष  गुण आहे. विनोदराय इन कार्पोरेटमधील जवळपास प्रत्येक कामगार आज परदेशवारी करून आला आहे. मशिनरीज बसवण्याच्या अथवा नंतरच्या दुरूस्तीसेवा या निमीताने त्यांच्या कारखान्यातील सामान्य वर्कर परदेशात जाऊन येतो अशी अनेक माणसे घडवण्याचा त्यांचा उपक्रम हा अखंड चालू असतो. जालन्यातील 40 उद्योजकांना लघु उद्योग भारतीच्या माध्यमातून चीन देशाच्या प्रगत औद्योगिक वसाहतीचे दर्शन घडवण्याचा उपक्रम त्यांनी राबवला.

जालना जिल्हयातील शैक्षणिक  उन्नतीच्या अनेक प्रकल्पांमध्ये सुनिल रायठठ्ठा प्रत्यक्ष सहभागी आहेत. जिल्हा परिषदांच्या  शाळांमधून इ-लर्निग ची व्यवस्था  निर्माण करून देणे. इंग्लीश हेल्पर या अत्याधुनिक संगणकीय प्रणाली बसवणे, शालेय परिसर व त्यातील स्वच्छतागृहांची निर्मीती असे अनेक उपक्रम सुनिल रायठठ्ठा राबवत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वातंत्र्यदिनाच्या संबोधनाच्या आशयातील अनेक उपक्रम रायठठ्ठा हे गेल्या कित्येक वर्षापासून राबवत आहेत.

उद्योग व्यवसाय, सामाजिक, शैक्षणिक कार्यासोबत पाणी या समस्येवर गेल्या पाच वर्षापासून रायठठ्ठा काम करत आहेत. जालना शहराला पाणी पुरवठा करणा-या घाणेवाडी जलाशयातील गाळ उपसण्याचा गत चार वर्षापासूनचा घाणेवाडी जलसंरक्षण मंचाचा उपक्रम तसेच दुष्काळातील जालना जिल्हयात शिरपूर पध्दतीच्या बंधा-यांची निर्मीती करणा-या सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ या सेवाभावी संस्थेचे सुनिल रायठठ्ठा उपाध्यक्ष आहेत. यासर्व कामांच्या पाठीशी सुनिल रायठठ्ठा यांचा सक्रीय सहभाग अत्यंत मोलाचा आहे.

बहुस्पर्शी व बहुआयामी व्यक्तीमत्वाचे सुनिल रायठठ्ठा हे सकारात्मक उर्जेचे जालन्यातील विश्व भाग्यवान असल्याचा निश्चित अनुभव येतो. शुन्यातून विश्व निर्माण करणा-या उद्योजकाच्या वाटचालीचा हा प्रवास भारताच्या सीमा ओलांडून.  संचार करत आहे. जालन्याचे नाव ख-या अर्थाने संपूर्ण विश्वात पोहोचविणारे सुनिल रायठठ्ठा हे व्यक्तीमत्व जालन्याचे भूषण आहेत उर्जाकेंद्र आहेत.